महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९१ वा | दिनांक : १९/०९/२०२५ | वार : शुक्रवार

## जीआर मागे घ्या नाहीतर आवश्यक सुधारणा करा : छगन भुजबळ



**नाशिक** : मराठा समाजाला आरक्षण जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रातील ओबीसी समाज नाराज झाला आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे दाखवली आहे. अनेकवेळा पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच राज्य सरकारने काढलेल्या जीआरवर देखील त्यांनी आक्षेप नोंदवला आहे. हा जीआर मागे घ्या, नाहीतर आवश्यक ते बदल करा, अशी मागणी त्यांनी केली आहे. आज देखील भाषणात बोलताना छगन भुजबळ यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरून टीका केली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, मराठा समाजाचा मोठा विजय झाला अशा बातम्या येत आहेत. मीडिया मंडळींनी नीट ऐकून घ्यावे हा जीआर निघाल्यानंतर अनेकांनी आपापल्या पद्धतीने हायकोर्टाकडे धाव घेतली. त्यातल्या काही लोकांनी पीआयएल केले, आम्ही त्यांना सांगितले हे चुकीचे होईल. अनेक वकील जे आहेत त्यांच्याशी आम्ही रात्रंदिवस चर्चा करत आहोत. त्यांनी सांगितले की आपल्याला पीआयएल नाही करायचे रिट करायचे. मग ज्यांनी पीआयएल केले होते त्यांनी विनंती केली की आम्हाला रिट करण्यासाठी मुभा द्यावी. तिथे त्यांचा पीआयएल नाकारला गेला त्यामुळे चुकीचा गैरसमज लोकांमध्ये पसरला.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, आतापर्यंत आम्ही चार ते पाच रिट अर्ज केले आहेत. एक केले आहे कुणबी सेनेच्या वतीने, दुसरे केले आहे नाभीक समाजाच्या वतीने, तिसरे माळी समाजाच्या वतीने, चौथे जे आहे समता परिषदेचे आमचे एक अधिकारी आहेत त्यांच्या वतीने केले आहे. असे आमचे ५-६ रिट केलेले आहे. आता त्याची सुनावणी सुरू होईल आणि अतिशय काळजीपूर्वक वकील नेमले आहेत. मला खात्री आहे की निश्चितपणे आपली मागणी आहे एकतर हा जीआर मागे घ्या नाहीतर आवश्यक त्या सुधारणा करा, अशी आपली मागणी आहे. त्यात निश्चितपणे आपल्याला यश मिळणार, असा विश्वास भुजबळ यांनी व्यक्त केला.

एक इतिहास म्हणून आपल्याला माहीत पाहिजे की मंडल आयोगाच्या पूर्वी वेगवेगळ्या राज्यांनी आपापल्या परीने वेगवेगळ्या समाजाला आरक्षण दिले. देशमुख समिती फार नंतर स्थापन करण्यात आली. त्यांनी सांगितले होते की मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलेले आहे की हा ओबीसी समाज त्यात आज देशात हजारो जाती आहेत, आपल्याकडे ३७४ जाती आहेत. हा अतिशय गरीब आहे, अडचणीतला आहे. यांची माहिती गोळा करा, आयोग निर्माण करा आणि यांना आरक्षण द्यायला पाहिजे. कळम ३४१ मध्ये त्यांनी दलितांना आरक्षण देण्याचे सांगितले आहे, ३४२ मध्ये आदिवासी समाजाला आरक्षण देण्याचे सांगितले आहे. परंतु, भारत सरकारने आयोग नेमला नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी भारत सरकारचा राजीनामा दिला त्यात त्यांनी जी कारणे लिहिली होती त्यात एक कारण हे देखील होते की मी सांगून सुद्धा या गरिबांसाठी आयोग नेमला नाही. मग कालेलकर आयोग नेमण्यात आला आणि त्यांनी सांगितले की आयोग नेमला पाहिजे, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली.

छगन भुजबळ म्हणाले, हा लढा बाबासाहेबांनी सुरू केला आहे. नंतर मंडल आयोग आला, तो आयोग सुद्धा दाबून ठेवला होता. नंतर व्ही.पी. सिंह आले आणि त्यांनी सांगितले की हा आयोग मला मान्य आहे आणि ओबीसींना आरक्षण देत आहे. त्यावेळी मी त्यांचे स्वागत केले. त्या दिवशी पेपरमध्ये आले होते की भुजबळ यांनी स्वागत केले. त्यावेळी मी शिवसेनेचा महापौर होतो. तेव्हा बाळासाहेब ठाकरे आणि आमचे मतभेद व्हायला सुरू झाले. नंतर मी ठरवले की एकाच ठिकाणी बाळासाहेब बोलणार आणि मी बोलणार हे योग्य नाही. त्यांचे म्हणणे होते की आर्थिक निकषावर आरक्षण दिले पाहिजे. आर्थिक निकषावर आरक्षण आपण एकवेळ मान्य जर केले, तर मला सांगा की हे मुंडे आहेत, सध्या ते गरीब आहेत आणि नंतर ते चांगले श्रीमंत झाले, तर काय करणार? अजून तसेच कोणीतरी श्रीमंत आहेत पण त्यांच्या धंद्यात खोट आली आणि ते गरीब झाले माग तेव्हा ते म्हणणार आता मला आरक्षण द्या. किती वेळा आरक्षण देणार आणि काढणार? असा प्रश्न भुजबळ यांनी उपस्थित केला.

छगन भुजबळ म्हणाले, आज झोपडपट्टीमध्ये गेलो तर तिथे राहणारे कोणते लोक दिसतात? दलित लोक दिसतात, झाले का ते श्रीमंत? आरक्षण मिळाले की लगेच नोकऱ्या लागल्या असा समज करून देण्यात आला आहे. आमचे लेकरं बाळं म्हणतात, अरे बाबा जशी तुमची लेकरं बाळं आहेत, तशी या गोरगरीब जनतेची सुद्धा लेकरं बाळं आहेत, त्यांची काय कुत्री मांजरं आहेत का रे? असे म्हणत भुजबळ यांनी अप्रत्यक्ष मनोज जरांगे यांना सवाल केला आहे. गरीबी सगळीकडे आहे. पण गरीबी हटवण्यासाठी भारत सरकार वेगवेगळे कार्यक्रम देत आहे. ओबीसी म्हणजे जात नाही. अनेक जातींचा समूह आहे. मराठा एक जात आहे. आमची मागणी आहे जात जनगणना करा.

## बळीराजा संकटात, ओला दुष्काळ जाहीर करावा : जयंत पाटील



**मंबई** : राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विविध भागात पूरस्थिती निर्माण झाली असून शेतीचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. "बळीराजा इतक्या अडचणीत असताना या सरकारच्या हृदयाला पाझर कसा फुटत नाही?" असा सवाल त्यांनी पत्राद्वारे विचारला आहे.

राज्यातील जवळपास ३० जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे लाखो शेतकरी बाधित झाले आहेत. शेती पिके, घरे, जनावरे आणि गोठे पाण्याखाली गेल्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी सरकारने त्वरित पावले उचलणे आवश्यक असल्याचे जयंत पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.

जयंत पाटील यांनी सरकारकडे तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच, शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करून त्यांना संकटातून बाहेर काढण्यास मदत करावी, अशी विनंतीही त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून त्यांना तातडीने मदत पोहोचवणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

राज्यात पावसाचे थैमान चालू असून गेल्या दोन महिन्यांत अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील तब्बल १७ लाख ८५ हजार हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. मुसळधार पावसामुळे नाल्याला पूर येऊन शेतीचे आणि ओढ्यालगत असलेल्या घरांचे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिके पूर्णपणे पाण्याखाली गेली आहेत. पावसामुळे शेतातील माती वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात अडचणीत सापडला आहे.

अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ढिसाळ कार्यपद्धतीमुळे पंचनामे वेळेत होत नसून त्याची माहिती सर्व शेतकऱ्यांना दिली जात नाही. पंचनामे झाले तरी वास्तव नुकसानाचे योग्य मुल्यमापन होत नसल्याने शेतकऱ्यांच्या मनात तीव्र संताप निर्माण झाला आहे. पाऊस सर्वत्र पडलेला असल्यामुळे नुकसानही सर्वच शेतकऱ्यांचे झाले आहे. बँकांचे हप्ते कसे फेडायचे, मुलांचे शिक्षण कसे करायचे असे प्रश्न पिडीत शेतकरी करत आहेत, असे जयंत पाटील यांनी पत्रात म्हटले आहे.

तसेच पीकविमा कंपन्यांवर दबाव आणून शेतकऱ्यांना तातडीने विमा दावे अदा करण्याचे आदेश द्यावेत. बँकाकडून होत असलेली वसुलीची कार्यवाही तात्काळ थांबवावी. शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त बियाणे व खतांचा पुरवठा उपलब्ध करुन द्यावा असेही जयंत पाटील म्हणाले. सरकारने पंचनाम्याच्या नावाखाली वेळकाढूपणा थांबवावा आणि शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करावी. केवळ पीक नुकसान नव्हे तर जनावरांचे, घरांचे व गोठ्यांचे नुकसान यासाठीही मदत जाहीर केली जावी, अशी विनंती जयंत पाटील यांनी पत्रातून केली आहे.

## सरकारी वाहनांच्या खरेदीसाठी नवीन नियम

**मुंबई** :सरकारी अधिकारी आणि मंत्र्यांसाठी वाहन खरेदीच्या नियमांमध्ये महाराष्ट्र सरकारने मोठे बदल केले आहेत. अर्थ विभागाने १७ सप्टेंबर २०२५ पासून लागू होणारा एक नवीन शासन निर्णय जारी केला आहे, ज्यानुसार आता मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या वाहन खरेदीसाठी खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यापूर्वीचे सर्व संबंधित आदेश रद्द करण्यात आले आहेत. मात्र, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्या वाहनांच्या खरेदीवर कोणतीही किंमत मर्यादा ठेवण्यात आलेली नाही.

वाहन उत्पादन खर्च, वाढती महागाई आणि बीएस-६ (BS-VI) मानकांची नवीन वाहने यांच्या वाढलेल्या किमती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. या नवीन नियमांमुळे सरकारी खर्चावर नियंत्रण आणण्यास मदत होणार असून, वाहनांच्या खरेदी प्रक्रियेत अधिक स्पष्टता येणार आहे. या निर्णयामुळे प्रशासनात आर्थिक शिस्त आणण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे दिसून येत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५


## श्री संत जनार्दन स्वामी गुरुकुल मध्ये मराठवाडा मुक्ती संग्रामदिन उत्साहात साजरा







**खुलताबाद (प्रा. योगेश रावते) :** वेरूळ येथील श्री संत जनार्दन स्वामी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) मध्ये 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे समन्वयक श्री बाजीराव काळोखे गुरुजी लाभले होते, तर मुख्य ध्वजपूजक व ध्वजारोहक म्हणून आश्रमीय संत कृषीभूषण महंत स्वामी लक्ष्मणगिरीजी महाराज हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री बाळासाहेब हिवर्डे हे होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बाबाजींच्या मूर्तीचे तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी सामूहिक राष्ट्रगीत व राज्य गीत गायन घेण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी कवायतीचे प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य श्री दिनकर ढोबळे यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी संस्कृत, इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेतून भाषणे केली. तसेच देशभक्तीपर गीतांसह सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात

## ट्रकने दुचाकी स्वारला चिरडले जागीच मृत्यू (खडयाचा अजून एक बळी)



**दौलताबाद (जोवद अहेमद) :** बुधवार रोजी संध्याकाळी धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गवरील माळीवाडा गावाजवळील रेल्वे उड्डाणपूल जवळ ट्रक ने दुचाकी स्वार ला चिरडले स्कूटर चालक ज्ञानेश्वर महादु जगधणे वय ४० रा.माळीवाडा हा जागीच ठार झाला असून स्कूटर चा नंबर एम एच २० बी पी १४०४ आहे.

ज्ञानेश्वर हा माळीवाडा येथून रोज सकाळी वाळुज एम आय डी सी कंपनीत कामाला जात होता कंपनी तुन काम आटोपून संध्याकाळी घरी जाण्यासाठी निघाला होता घराच्या काही अंतरावर करोडी टोल नाक्याच्या पुढे माळीवाडा पुलाजवळ रस्त्यावर खड्डा असल्याने त्याची स्कूटरला पाठीमागून येणारे माल वाहतूक चे मोठे ट्रक क्र RJ GG 4967 ने त्याला ट्रक खाली चिरडून पुढे निघून गेला त्याच वेळी दौलताबाद येथील प्रत्यक्षदर्शी युवक सचिन म्हस्के हा आपल्या एका मित्रा सोबत त्याच रस्त्याने येत होते त्याने तो अपघात पहिला व ट्रक थांबत नाही म्हणून त्याचा पाठलाग करत त्याला जांभाळा गावाच्या पुढे रामदेव हॉटेल समोर ट्रक पकडून दौलताबाद पोलिसांच्या स्वाधीन केले चालक फरार झाला होताज्ञानेश्वर च्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ , भावजाई असा परिवार आहे.

# डॉ. रफिक जकरिया कॉलेज फॉर वुमेन मध्ये पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय इतिहास हा शौर्य, त्याग, नेतृत्व आणि कर्तृत्वाच्या असंख्य पानांनी समृद्ध आहे. या इतिहासातील महान महिलांनी केलेले कार्य ही केवळ भूतकाळाची परंपरा नसून आजच्या आणि उद्याच्या पिढीसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. रफिक जकरिया कॉलेज फॉर वुमेन, नवखंडा पॅलेस, जुबली पार्क येथील इतिहास विभागाने "भारतीय इतिहासातील महान महिला" या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन केले.

प्राचार्य डॉ. मकदुम फारुकी यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. या स्पर्धेत एकूण वीस विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. प्राचीन काळापासून ते आधुनिक भारतापर्यंत अनेक महान महिलांचे कार्य पोस्टर्सच्या माध्यमातून साकारण्यात आले. रजिया सुलताना, सावित्रीबाई फुले, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, कर्नल सोफिया कुरेशी, सुनीता विल्यम्स ते महाराणी ताराबाई अशा अनेक कर्तृत्ववान महिलांचे जीवन विद्यार्थिनींनी नव्या दृष्टिकोनातून उलगडले.

स्पर्धेचे परीक्षण डॉ. शेख एजाज (माजी प्राचार्य, चिश्तिया कला व विज्ञान महाविद्यालय) आणि डॉ. शेख मुसाक रजाक (प्रमुख, इतिहास विभाग, मौलाना आझाद महाविद्यालय) यांनी केले. विद्यार्थिनींच्या अभ्यासपूर्ण आणि सर्जनशील मांडणीचे कौतुक करत त्यांनी मत व्यक्त केले की, "इतिहासाचा अभ्यास केवळ पुस्तकापुरता मर्यादित न ठेवता अशा उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये विचारांची नवी दिशा निर्माण होते."

पारितोषिक विजेत्या विद्यार्थिनी :प्रथम क्रमांक – सय्यद सामिया (बीए तृतीय वर्ष) : इंदिरा गांधी यांच्या जीवनावर आधारित पोस्टर.द्वितीय क्रमांक – शेख मादीहा (बीए तृतीय वर्ष) : कर्नल सोफिया कुरेशी यांच्या जीवनावर आधारित पोस्टर. तृतीय क्रमांक – आलीना फिरदोस (बीए प्रथम वर्ष) : रजिया सुलताना यांच्या जीवनावर आधारित पोस्टर. उत्तेजनार्थ पारितोषिक – सय्यदा आयशा (बीए द्वितीय वर्ष) आणि मैमुना अफरोज (बीए तृतीय वर्ष). समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. मकदुम फारुकी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून म्हटले की, "इतिहासातील या महान महिलांचे जीवन प्रत्येक विद्यार्थिनीने प्रेरणेचे साधन मानावे.

त्यांच्या संघर्षकथा आपल्याला आयुष्यातील अडथळ्यांवर मात करून ध्येय गाठण्याची शिकवण देतात." त्यांनी विद्यार्थिनींना इतिहासाच्या अभ्यासातून जीवनमूल्ये आत्मसात करण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शेख अब्दुल्ला यांनी केले तर सूत्रसंचालनाची जबाबदारी डॉ. लुबना शिरीन यांनी पार पाडली. महाविद्यालयातील प्राध्यापक यांनी यासाठी दिलेल्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५

## धुळे सोलापूर महामार्गावर सतत होणारे अपघात टाळण्यासाठी पोलीस उपायुक्त यांनी घेतली बैठक



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : धुळे सोलापूर महामार्गावर सतत होणारे अपघात टाळण्यासाठी पोलिस उप.आयुक्त परिमंडळ १ पंकज अतुलकर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकारी, दौलताबाद पोलीस स्टेशन,माळीवाडा आणि फतीयाबाद येथील ग्रामस्थ यांची संयुक्त बैठक पोलीस उपायुक्त कार्यालयात गुरुवारी दुपारी ४ वाजता घेण्यात आली.

यात दोन्ही गावातील ग्रामस्थांनी प्रामुख्याने कसाबखेडा फाटा ते करोडी टोल नाक्या पर्यंत असलेले रस्त्यावर पडलेले खड्डे ज्या मुळे दररोज अपघात घडत असून ते खड्डे दोन दिवसात बुजवणे,,वाहनाच्या वेग मर्यादेसाठी गरजेच्या ठिकाणी रामलिंग स्ट्रीप (ब्रेक) टाकने, अपघात टाळण्या अनाधिकृत रोड दुभाजक्रावर केलेले रस्ते बंद करणे, गावाच्या ठिकाणी सोलार सिग्नल लावणे, माळीवाडा गावाजवळील सर्विस रोड डाग डूजी करणे, दिशादर्शक फलक लावणे, उड्डाणपुलावरील व पुलाखाली रात्रीच्या वेळेस पथदिवे सुरू ठेवणे, पुलावरील जमा होत असलेले पाण्याचा निचारा करणे, रस्त्याच्या दोन्ही बाजू कडील नाल्या साफ करणे आदी मुद्दे मांडले.

ही बैठक दौलताबाद पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांच्या पुढाकाराने घेण्यात आली दि.१७ रोजी रात्री ट्रकने दुचाकी ला उडवल्याने माळीवाडा येथील ज्ञानेश्वर जगधने यांचा जागीच मृत्यू झाला होता.

ज्या खड्ड्या मुळे सदर व्यक्तीचा मृत्यू झाला होता त्याठिकाणीच अंत विधी करायचा नियोजन ग्रामस्थानी केले होते पण पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांनी ग्रामस्थांचे समजूत काढून ही बैठक घडवून आणली.

यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण संचालक अमरीश मानकर,व्यवस्थापक संघर्ष विश्राम, साइड इंजिनियर अशिष देवतकर, माळीवाडा उप सरपंच मनेश गाजरे, ग्रामपंचायत सदस्य कृष्णा मुळे, प्रवीण बडे व बाळू हेकडे,बबन साठे,बाबासाहेब नरवडे,नंदू मुळे, सागर,नारायण ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होते

## पुण्यातील संशोधक विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला छत्रपती संभाजीनगरात एसएफआय चा पाठिंबा




**छत्रपती संभाजीनगर** : पुणे शहरात पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांचे सुरु असलेले आंदोलन आज अधिक व्यापक झाले असून, त्याला राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे. त्याच पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) तर्फे जाहीर निदर्शने करण्यात आली.

सायंकाळी ६:३० वाजता झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. निदर्शनावेळी शासन आणि संबंधित संस्थांविरोधात घोषणाबाजी करत संशोधकांच्या न्याय्य मागण्या मान्य करण्याची मागणी करण्यात आली.खालील मागण्यांना पाठिंबा देण्यात आला.

1. सारथी, महाज्योती, बार्टी, अमृत, आर्टी आदी सर्व संस्थांकडून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी फेलोशिपच्या जाहिराती तात्काळ प्रसिद्ध कराव्यात. 2. नोंदणी दिनांकापासून दोन्ही बंचच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र जाहिरात प्रसिद्ध करून सरसकट फेलोशिप लागू करण्यात यावी.

3. संपूर्ण निवड प्रक्रिया एका महिन्याच्या आत तातडीने पूर्ण करण्यात यावी.4. प्रलंबित व थकीत फेलोशिप लगेचच वितरित करावी.एसएफआय (SFI) चा इशाराया निदर्शनात विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करून शासनाला इशारा दिला की, जर तात्काळ तोडगा निघाला नाही तर राज्यभर तीव्र आंदोलन उभारले जाईल.

पुणे येथील संशोधक विद्यार्थ्यांच्या संघर्षाला बळकटी देण्यासाठी मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी एकजुट दाखवली आहे.SFI च्या या निदर्शनामुळे संशोधक विद्यार्थ्यांचा प्रश्न आता अधिक गंभीर झाला असून, शासनाने त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होत आहे.या प्रसंगी कॉम्रेड लोकेश कांबळे, सुरज देवकर, प्रदीप चव्हाण, सलमान खान, पांडुरंग मगर व विद्यापीठातील विविध विभागांतील विद्यार्थी उपस्थित होते.

# केसापुरी रामपुरी ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंच पदी ज्ञानेश्वर प्रल्हाद पवार यांची बिनविरोध निवड




**दौलताबाद (जावेद अहेमद / प्रा. शिवाजी गायकवाड)** : केसापुरी रामपुरी ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंच पदी ज्ञानेश्वर प्रल्हाद पवार यांची बिनविरोध निवडग्रामपंचायत उपसरपंच पदाचा राजेश रोहिदास राठोड यांनी राजीनामा दिल्या नंतर रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्याचे रोजी आदेश पारित केले होते.

त्या अनुषंगाने दि १८ बुधवार निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात आलीअध्यासी अधिकारी म्हणून मंडळ अधिकारी गणेश सोनवणे हे होते तर अध्यक्ष म्हणून सरपंच रुखमन माधव पवार हे होतेउपसरपंच पदासाठी ज्ञानेश्वर पवार यांचे एकमेव अर्ज दाखल झाले असल्याने दोन वाजता सरपंच रुखमन पवार यांच्या उपस्थितीत ज्ञानेश्वर पवार यांना उपसरपंच म्हणून अधिकारी गणेश सोनवणे यांनी जाहीर केलेनिवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ग्रामविकास पंचायत अधिकारी विलास कचकुरे,ग्राम महसूल अधिकारी प्रशांत वनकर, मिलिंद साठे यानी मदत केली.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य रामनाथ गुंजाळ, गिरजाबाई जाधव,सोनाली दिगंबर धनवटे,लिलाबाई कडुबा पवार, संगीता साहेबराव मोरे, राजेश राठोड, शिलाबाई जाधव,रामकाबाई जाधव उपस्थित होते.

त्यांचे या निवडीचे धोंडीराम निकम,भगवान राठोड,कैलास निकम, वाल्मिक सुराशे,ज्ञानेश्वर कळसकर,साहेबराव मोरे,कुंदन मोरे,काकासाहेब गुंजाळ, माधव पवार, भाऊलाल जाधव ,गोविंद जाधव,चेतन जाधव,दिगंबर धनवटे,दिलीप राठोड, गणेश सुराशे,सुनील निकम,ग्रामस्थ आदींनी अभिनंदन केले आहे

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५

# कदेर व मुरळी परिसरात ढगफुटीमुळे हाहाकार माजला






**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कदेर व कदेर परिसरातील,मुरळी याभागात मंगळवारी रात्रभर तसेच बुधवार (१७ सप्टेंबर) रोजी पहाटे 3 ते सकाळी ७ पर्यंत ढगफुटीमुळे हाहाकार माजला होता.

मोठयाप्रमाणात आलेल्या पावसाने शेतातील सोयाबीन,उडीद,ऊस,तूर यासारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. दरम्यान प्रशासनाने तातडीने नुकसानीची पाहणी करावेत अशी मागणी कदेर तसेच परिसरातील भागातील शेतकऱ्यासह विविध राजकीय पक्ष आणि संघटनेच्यावतीने करण्यात येत असून याबाबत मंगळवारी व बुधवारी ढगफुटीमुळे जनजीवन विस्कळीत झाले.

आलेल्या जोरदार पावससाने शेतीपिकाचे नुकसान मोठया प्रमाणात झाले आहे त्यामुळे प्रशासनाने तातडीने नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

मुरूम मार्गे कदेर गुंजोटी उमरगा जाणारी बस गावाजवळील पुलावरून पाणी जात असल्यामुळे जागेवर सकाळी ७:३० ते ९ वाजेपर्यंत थांबून होती.वाहतूक सेवा २ ते ३ तास बंद राहिली.“अतिवृष्टीमुळे खरीप पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे,

उडीद,सोयाबीन पीक हातातून पूर्णपणे गेले आहे त्यामुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने मदत करून दिलासा द्यावा” — मनोज पाटीलसामाजिक कार्यकर्ते“अतिवृष्टीमुळे शेती पिकाचे नुकसान झाले आहे .ग्रामीण भागातील अनेक लोकांचे राहते दगडाच्या घरांच्या भिंतीचे पडझड झाल्याने अनेक कुटुंब उघड्यावर आले आहेत.

त्यामुळे शासनाने तात्काळ मदत द्यावी”— विजयकुमार बिराजदार ,माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष व शेतकरी“शेतीपिकाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आता आर्थिक समस्याला तोंड द्यावा लागणार आहे,पेरणीसाठी झालेला आर्थिक खर्च व त्यासाठी इतरांकडून घेतलेली रक्कम फेडावे कसे याची चिंता आहे म्हणून शासनाने तात्काळ मदत द्यावी”— दिलीप कांबळे,शेतकरी

# भारत शिक्षण संस्थेस आदर्श संस्था चालक पुरस्कार अध्यक्ष अमोल मोरे यांना प्रदान



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे यांना आदर्श शिक्षण संस्था चालक पुरस्कार आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव यांच्या वतीने देण्यात आला. या पुरस्काराचे वितरण धाराशिव तेथे श्री सुधीर पाटील आणि मान्यवरांच्या हस्ते मोरे यांच्या वतीने प्राचार्य डॉ संजय अस्वले आणि डॉ देवरकर यानी स्विकारले.

या पुरस्काराचे सन्मानपत्र अध्यक्ष श्री अमोल मोरे यांना देउन अभिनंदन करताना प्राचार्य डॉ संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ पी ए पीटले, पर्यवेक्षक एस ए महामुनी, डॉ पी एस माने, डॉ एन एम मोरे, डॉ. व्ही एस सूर्यवंशी, डॉ.ए. एस. पदमपल्ले, डॉ. ए. एस. आष्टे, डॉक्टर डी बी ढोबळे, डॉ. बी ए शेळके, डॉ. सी डी करे.श्री मोरे यांनी अध्यक्षपदाच्या कार्यकाळात उमरगा परिसरात फार्मसी महाविद्यालयाची सोय उपलब्ध केली. तसेच नॅक तिसऱ्या सायकलमध्ये महाविद्यालयाला अ दर्जा दर्जा मिळवून दिला.

तसेच महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा अत्याधुनिक करताना संगणक प्रयोगशाळा, रेफ्रिजरेटर आणि एसी लॅब, तसेच करिअर कट्टा स्वतंत्र स्पर्धा परीक्षा डिजिटल क्लासरूम, हरित परिसर तसेच विविध शाखांच्या गुणवत्ते वाढीवर भर दिला. जिल्ह्यातील पहिले नेमबाजी प्रशिक्षण केंद्र सुरू केले.

संस्थेचे संस्थापक तात्यारावजी मोरे आबा, त्यानंतर श्रीधररावजी मोरे अण्णा , आणि शिवाजीराव दाजी मोरे यांनी घालून दिलेला शिक्षणातून सामाजिक बांधिलकीचा वसा जपताना आधुनिकीकरणावर भर दिला. म्हणूनच आदर्श संस्थाचालक हा सन्मान त्यांना मिळाला आहे.

या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आश्लेष मोरे, सरचिटणीस जनार्दन साठे, सचिव पद्माकर राव हराळकर, सहसचिव डॉक्टर सुभाष वाघमोडे, सर्व संचालक मंडळ, सदस्य त्याचबरोबर संस्थेचे कर्मचारी वृंद यांनीही अभिनंदन केले आहे.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५


## जयभवानी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती दिन उत्सात साजरा



पाटोदा (प्रतिनिधी )दि.१७ सप्टेबर : येथिल जयभवानी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

माजी स्वातंत्रय सैनिक श्रीमती आयोध्याबाई एकनाथ बांगर यांच्या शुभहस्ते सकाळी ठिक ८:१५ वाजता ध्वजारोहण करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते.

तर प्रमुख पाहुणे म्हणुन मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम तर प्रमुख उपस्थिती मध्ये पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष मा.श्री.राजेंद्र जाधव ,विकास समितीचे सदस्य श्री.शिवभूषण जाधव, विकास समिती सदस्य, श्री.दिलीपराव जाधव,माजी सभापती श्री.महादेव जाधव, डॉ.के.टी.सानप,जेष्ठ पत्रकार.श्री.विजय जाधव,श्री.विजय जोशी,श्री.राजेंद्र राऊत, श्री.नवनाथ जाधव,माजी नगरसेवक श्री.शाहाबाज सय्यद यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान यांनी केले.प्रथम मुक्तीसंग्रमातील शहीद स्वातंत्र्य सैनिकांना सामुहिक अभिवादन ! करण्यात आले.

श्रीमती आयोध्याबाईज्ञबांगर व नगराध्यक्ष श्री.राजेंद्र जाधव यांनी मराठवाडा मुक्ती लढा या विषयी माहिती सांगुन.सर्वांना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य सोमनाथ घाडगे यांनी केला. ध्वजारोहण सोहळ्याचे संचलन क्रिडा विभागाचे प्रा. डॉ.प्रविण शिलेदार यांनी केले.तर कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले व आभार प्रा.शिवाजी भोरे यांनी मानले.या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद ,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी ओझोनचे संरक्षण आवश्यक : डॉ. विनोद देवरकर





**उमरगा** : सूर्यापासून निघणाऱ्या अतिनील किरणांपासून पृथ्वीचे संरक्षण करण्याची महत्त्वाची भूमिका ओझोन थराची आहे. अतिनील किरणे सरळ पृथ्वीवर आल्यास पृथ्वीवरील तापमान वाढ होते व त्यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात येते.

यापासून जीवसृष्टीचे अस्तित्व टिकवायचे असेल तर ओझोन थराचे संरक्षण करणे गरजेचे आहे असे मत डॉ. विनोद देवरकर यांनी व्यक्त केले. ते काल दिनांक आठरा सप्टेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले हे होते.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या वतीने 'ओझोन दिन' दिनांक 18 सप्टेंबर 2025 रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. विनोद देवरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पृथ्वी गोलास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. पुढे बोलताना डॉ. देवरकर म्हणाले की ओझोन थर वाचला तरच पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व टिकेल. पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी आणि पुढील पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने पावले उचलली पाहिजेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. धनराज इटले यांनी केले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विज्ञान आणि भूगोल येथील अंतरसंबंधावर आपले भाष्य केले.याप्रसंगी भूगोल विभागातील डॉ. रंजना चोंचंडे, प्रा. सुजित शिंदे, प्रा. बाळासाहेब मोरे, प्रा. बालिका गायकवाड आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सूर्यकांत राठोड यांनी केले तर डॉ. सतीश गावित यांनी उपस्थितांचे आभार मानले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002







## भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात मराठवाडा स्वतंत्र दिनानिमित्त ध्वजारोहण



**करमाड** : मराठवाडा स्वतंत्र दिन १७ सप्टेंबर १९४८ रोजी ... तर आज औचित्य साधून ७७ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आज भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात ठिक सकाळी ७:२० वाजता पार पडला ध्वजारोहण श्री. जनार्दन चव्हाण (ग्रामपंचायत सदस्य) यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी श्री. पंढरीनाथ चव्हाण श्री. सुदामभाऊ मते (माजी सरपंच) श्री. सोमनाथ मते (सरपंच), श्री. विलासराव देवकर, पोलीस पाटील सौ. विशाखा जगन्नाथ साळवे तसेच सुंदरराव देवकर संदीप देवकर... व प्राचार्य संतोष पुंडगे सर आणी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थी, पालक हे आवर्जून उपस्थित होते...

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५


## आज पितृपक्षात

माझ्या बापाने आज
आजोबांना नैवद्य देतांना
अन् कावळ्यांनी तो फुकटात खातांना..

सहज विचार आला मनात
काय नेमका हा पितृपंधरवाडा
श्रध्दा की अंधश्रद्धा
की मागून पुढे पिढ्यानपिढ्या चाललेला
व्यर्थ खुळचट कल्पनेचा बाजार..

पण थोडा विचार करता झालो
वाडवडिलांच्या कष्टाचा
त्यांनी आम्हाला दिलेल्या संस्कार शिदोरीचा..
आमच्या पोटापाण्यासाठी
जीवाचं रान करून जपून ठेवलेल्या रानाचा..

कावळे एक प्रतिक फक्त
स्वर्गलोकातील त्या पवित्र आत्म्याचं
कृतज्ञता बाळगू म्हणतो आज
लक्षण तेच माणुसकीचं.... **ज्ञानेश्वर गायके,**
**खामगाव**
**मो.9403384889**

# तिसगाव विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील तिसगाव विद्यालय तिसगाव येथे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने गावातून प्रभात फेरी काढण्यात आली होती कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी मुख्याध्यापक चंद्रभान पवार, प्रमुख पाहुणे योगेश बाबु राठोड व ग्रामपंचायतचे सदस्य संजय राठोड हे होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन लाभले.त्याचबरोबर हिवर्डे सर यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास आणि या दिवसाचे महत्त्व समजावून सांगितले आणि स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान त्यांच्या मनात रुजवले पाहिजे आणी मुक्तीसाठी ज्यांनी ज्यांनी बलिदान दिले त्यांच्या आठवणींचा हा दिवस आहे असे सांगितले अध्यक्षीय भाषणात बोलताना पवार सर म्हणाले.

सर्वांनी एकजुटीने राहणे गरजेचे आहे देशाप्रती प्रेम व आदराची भावना ठेवणे गरजेचे आहे ते आपण केलं पाहिजे असे आव्हान केले. संजय राठोड म्हणाले मुक्ती संग्रामासाठी ज्यांनी प्राणांचे बलिदान दिले त्यांना आपण नेहमी स्मरणात ठेवले पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. एस. राठोड व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांचे आभार आर.जी. वानखेडे यांनी मानले या कार्यक्रमास विद्यालयाचे व जिल्हा परिषदेचे विद्यार्थी ,गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com